॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ११ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची फिरती विज्ञान प्रयोगशाळा (Mobile Science Exhibition Unit) दिनांक ११ ऑक्टोबर रोजी कासोदा तालुक्यातील विविध शाळांमध्ये पोहोचली. एकदिवसीय या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कुलगुरू प्रा. व्ही. एल. महेश्वरी आणि प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. यामुळे आदिवासी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान विषयांमध्ये प्रायोगिक अनुभव मिळतो, त्यांची शैक्षणिक आवड वाढते आणि विज्ञानातील नवनवीन संकल्पना प्रत्यक्ष पाहून समजून घेण्याची क्षमता विकसित होते.

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे समन्वयक डॉ. एस. एस. घोष यांनी कासोदा येथील प्रा. अशोक पाटील यांच्या सहकार्याने या भेटीचे आयोजन केले. या एकदिवसीय उपक्रमात एकूण ८८९ विद्यार्थ्यांनी फिरती विज्ञान प्रयोगशाळेला भेट दिली. या फिरती विज्ञान प्रयोगशाळेने लिटल व्हॅली प्री-प्रायमरी स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, कासोदा येथील ५४७ विद्यार्थी आणि बालविश्व प्री-प्रायमरी स्कूल, कासोदा येथील ३३२ विद्यार्थी यांना विज्ञान विषयांचा प्रात्यक्षिक अनुभव दिला. या भेटीमध्ये संघप्रमुख उमेश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पल्लवी चौधरी, सत्यजित राजपूत, पृथ्वीराज पवार आणि ऋषिकेश चौधरी यांनी बसमधील ३० हून अधिक प्रयोगांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच बस ड्रायव्हर गोरखनाथ बोरसे यांनी देखील या उपक्रमात सहकार्य केले.

**बातमी नं.२**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ११ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क' प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या बॅचची सुरुवात करण्यात आली आहे. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या उपस्थितीत अभ्यासक्रमाच्या माहितीपत्रकाचे औपचारिक अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभागाचे समन्वयक प्रा. विकास गिते यांनी सदर अभ्यासक्रमाची माहिती दिली. तसेच विभागामार्फत या वर्षापासून पासून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती आणि इंटर्नशिप बद्दल उपस्थितांना अवगत केले.यावेळी विद्यापीठात सुरु झालेल्या या रोजगारक्षम अभ्यासक्रमासाठी विज्ञान विषयातून बारावी उत्तीर्ण व्यक्ती नोदणी करू शकणार असल्याने जास्तीत जास्त संख्येने इच्छुकांनी लाभ घेण्याचे आवाहन विभागाचे समन्वयक प्रा. विकास गीते यांनी केले आहे.

अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे यांनी बौद्धिक संपदा हक्क नोंदणी वाढवण्यासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. या अभ्यासक्रमामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील विदयार्थ्यांना पेटंट एजन्ट किंवा पेटंट तपासनीस सारख्या पदांसाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी फायदा होणार आहे. तसेच अधिकाधिक प्रमाणात दर्जेदार पेटंट नोदणी होण्यासदेखील मदत होणार असल्याचे सागितले. आजच्या युगात बौद्धिक संपदा हक्कांचे महत्व विशद करताना प्रा. इंगळे यांनी समाजोपयोगी उपयुक्त संशोधन वाढवण्यावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे याप्रसंगी अधोरेखित केले आणि विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क विभागाच्या कामाचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमास बौद्धिक संपदा हक्क विभागातील पीठासीन प्राध्यापक डॉ. डी. जी. हुंडीवाले, रसायनशास्त्र विभागाचे संचालक प्रा. दीपक दलाल आणि संशोधक विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सारंग बारी तर आभारप्रदर्शन श्री. मयूर पाटील यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ११ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता